पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154129

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station लाप्रवि,मुंबई पहिली खबर क्र. FIR No. २१, वर्ष Year २०२१, दिनांक Date १५/०४/२०२१
2. (i) अधिनियम Act भ्र. प्रति. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ..., तारीख पासून Date from ३०/०१/२०२१ वेळ Time ..., तारीख पर्यंत Date to १५/०४/२०२१ वेळ Time ...
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ३०/०१/२०२१, वेळ Time ...
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०६/०१, तारीख Date १५/०४/२०२१ वेळ Time १४:५०
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ...
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name आर/मध्य वार्ड, ठिकाणाचे नंबर No. if any ..., गल्ली Ward ..., रस्त्याचे नाव Name of road चंदावरकर रोड
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place मनपा कार्यालय गाव Village ..., पोस्ट Post बोरीवली तालुका Taluka बोरीवली जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station बोरीवली (प), तालुका Taluka ..., जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name अश्विनी बोरुडे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सतिश शिवाजी बोरुडे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ०३/१०/१९८५ (३५ वर्षे) (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ७५१५८३०९९०
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. P8112573, दिल्याचा दिनांक Date of Issue १५/०२/२०१७ दिल्याचे ठिकाण Place of Issue मुंबई (f) व्यवसाय Occupation वेस्ट मॅनेजमेंट कन्स
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste मराठा, जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address टापको सावजी चाळ, गल्ली / सर्व्हे नं. Ward ..., घर / नाव नं. House/Name No. ०८ फोन / मो. नं. Phone/Mo. No. ७५१५८३०९९० पॅन नं. PAN No. ... गटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road मथुरा पके रोड क्रं-०४, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place बाराशिराई, गाव Village ..., पोस्ट Post ... पो. स्टे. P Stn. कांदिवली
   तालुका Taluka कांदिवली (प), जिल्हा Dist. मुंबई राज्य State महाराष्ट्र सध्याचा पत्ता Present Address वरीलप्रमाणे
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री लक्ष्मण भालचंद्र सुतार, वय ४६ वर्षे, पद-दुय्यम अभियंता (श्रेणी-२), आर/मध्य, मनपा, मुंबई
   रा.ठि. खोली क्र. ०४, मनपा कर्मचारी वसाहत, बोरीवली गॅरेज, बोरीवली (प), मुंबई-४०००९२

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी श्रीमती अश्विनी बोरुडे, रा: ठि: रुम नं-०८, शिपका रावजी चाळ, इराणीवाडी, पन्च के रोड नं-०५, कांदिवली (प). मुंबई हिच्या स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हीच गुन्ह्याची प्रथम खबर

समक्ष

(उमेश [illegible])
15/4/2021
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

Borude
15/4/2021

Scanned with CamScanner

**फिर्याद** दिनांक १५/०४/२०२१

माझे नाव अश्विनी सतीश बोरूडे, वय ३६ वर्षे, व्यवसाय – कचरा व्यवस्थापन, खत निर्मीती व पथनाटय आयोजन, रा.ठि. – शिपका रावजी चाळ, रुम नं ८, इराणीवाडी, हेमु कलानी रोड नं. ४, कांदीवली (प.) मुंबई–४०००६७. मो.क्र ७७१५८३०९९० असे आहे. मी समक्ष फिर्याद देत आहे की,

मी वरील प्रमाणे असुन वर दिलेल्या पत्यावर राहते. मी A.S. Enterprises या नावाने प्रोपरायटर म्हणुन स्वच्छता तसेच स्वच्छतेबाबत जनजागृती, पथनाटय तसेच विविध ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण सुका कचरा व ओला कचरा यात करुन, ओल्या कचऱ्यापासुन खतनिर्मिती करण्याचे काम करते. मुंबई महानगरपालिका तसेच शाळा, कॉलेज तसेच विविध सोसायटी येथे मी उपरोक्त नमुद उपक्रम राबवत असते.

मी सन २०२० मध्ये बृहन्मुंबई चे आर/मध्य विभाग, बोरीवली पश्चिम येथे वेगवेगळया ठिकाणी पथनाटय सादर केली होती. त्या अनुषंगाने सदर कामाचे माझे रू. २,६९,१००/– इतके बील झाले होते. सदर बीलामधुन टॅक्स वजा जाता मला एकुण २,६३,०००/– इतकी रक्कम मे २०२० मध्ये मिळाली होती. आर/मध्य विभागात काम करणारे श्री लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता हे माझेकडे सदरच्या मंजुर करण्यात आलेल्या बिलाच्या १५ टक्के इतकी रक्कम लाच म्हणुन वारंवार मागणी करीत होते. परंतु मी त्यांचे मागणीकडे कधी लक्ष दिले नव्हते.

जानेवारी २०२१ मध्ये मी पुन्हा नव्याने सदर कामाचे (पथनाटयाकरीता) कोटेशन भरले होते. माझे कोटेशनचा रेट कमी असल्याने मला ते काम मिळाले होते. त्याअनुषंगाने माझे पथकाने पथनाटय सादर करून, सदर कामाची पुर्तता मी मार्च २०२१ चे शेवटच्या आठवडयात केली होती. सदर केलेल्या कामाचे बील मंजुर होण्याकरीता मी आर/मध्य विभाग, येथे मार्च चे शेवटच्या आठवडयात बील टाकले होते. सदरचे बील हे प्रथम श्री लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता यांचेकडे येते व तेथुन ते पुढील कार्यवाहीकरीता त्यांचे वरीष्ठांकडे जात असते. सदर कामाचे कोटेशन भरण्यापुर्वीच श्री लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता यांनी मला बोलावुन, नवीन कामाचे बील मंजुर करायचे असेल तर, आधीच्या कामाच्या प्राप्त बिलाच्या रकमेच्या १५ टक्के म्हणजे रू. ४०,०००/– इतकी रक्कम त्यांना लाच म्हणुन दयावी लागेल असे मला सांगितले होते. मला श्री लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, मी दि. २८.०१.२०२१ रोजी आर/मध्य विभागात पथनाटयाचे कामाकरीता कोटेशन भरल्यानंतर, दि. ३०.०१.२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, येथे लेखी तक्रार नोंदविली होती. माझ्या लेखी तक्रारीवरुन पोनि विजयकुमार डोके यांनी दोन शासकीय पंचाना बोलावून श्री. लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता यांनी माझ्याकडे लाच मागीतली आहे किंवा कसे? याबाबत दिनांक ३०/०१/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, श्री. लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता यांनी स्वत:साठी व इतरांना देण्यासाठी रू. ४०,०००/– इतक्या लाचेच्या रकमेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. तसेच माझ्याकडे इतकी रक्कम रोखीने नसल्यास, सदर रक्कम हफ्त्याने त्यांना देण्यासाठी त्यांनी त्यांचे वैयक्तिक बॅक खाते नंबर मला देवुन, त्यांचे सदर खात्यात रक्कम जमा करणेबाबत मला सुचविले, परंतु सदरवेळी त्यांनी त्यांचा खाते क्रमांक मला दिला नव्हता. त्याबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

दि. ०३.०२.२०२१ रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आल्याचे पोनि डोके यांनी मला सांगितले. त्याअनुषंगाने मी दि. ०३.०२.२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी, मुंबई कार्यालयात आले, सदर वेळी पो.नि. उमेश गौंड यांचे सुचने प्रमाणे श्री लक्ष्मण सुतार यांचेशी फोनवर संपर्क करून त्यांचे बॅक खात्याची सविस्तर माहीती प्राप्त करून, मग त्यांचे बॅक खात्यात रक्कम जमा करण्याचे

उमेश रोशन गौंड
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

Borude
15/4/21

Scanned with CamScanner

ठरविण्यात आले. त्यानुसार मी माझे मोबाईल क्र. ७७१५८३०९९० वरून श्री. लक्ष्मण सुतार, यांचा मोबाईल क्र. ९९७००१५२६५ वर कॉल करून त्यांचे बॅक खात्याची माहीती विचारली असता, त्यांनी त्यांची पत्नी नामे सुनीता लक्ष्मण सुतार यांचा सेंट्रल बॅक ऑफ इंडीया, खाते क्र. ३१९४९५४१६८ ची माहीती माझे वरील मोबाईल नंबरचे व्हॉटस्अॅप वर पाठवुन दिली. त्यानंतर मी सदरचे बॅक खाते माझे रत्नाकर बॅकचे खात्यामध्ये बेनिफीशीयरी म्हणुन समाविष्ट केले.

परंतु अन्य प्रकरणात माझे कडे झालेल्या लाचेच्या मागणी अनुषंगाने मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात केलेल्या तक्रारी वरून कारवाईकरीता लाप्रवि पथकासोबत बाहेर जायचे असल्याने, या प्रकरणात पुढील कारवाई करण्यासाठी मला उपस्थित राहणे शक्य नसल्याने, कारवाई स्थगित करण्यात आली. मी लाप्रवि कार्यालयात लाचेच्या मागणी संदर्भात केलेल्या अन्य तक्रारीमध्ये सापळा कारवाई करण्यासाठी कालावधी लागणार असल्याने व त्याअनुषंगाने माझे नाव गोपनिय राहण्यासाठी, या प्रकरणातली सापळा कारवाई ही, माझे अन्य तक्रारीतील सापळा कारवाई पुर्ण होईपर्यंत स्थगित करण्यात आली. दि. २४.०३.२०२१ रोजी माझे अन्य तक्रारी संदर्भाने सापळा कारवाई पुर्ण झाल्यानंतर, सदर प्रकरणात पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरले होते. परंतु त्यानंतर माझी कामाचे अनुषंगाने प्रलंबित कामे पुर्ण करण्यासाठी, तसेच मी सुध्दा काही कालावधीकरीता आजारी असल्याने, दि. १५.०४.२०२१ रोजी सदर प्रकरणात सापळापुर्व व सापळा कारवाई करण्याचे ठरले. उपरोक्त कालावधीत श्री लक्ष्मण सुतार यांनी एकदा मोबाईलवर व मी माझे कामांसाठी आर/मध्य विभाग, बोरीवली या कार्यालयात गेले होते, सदरवेळी श्री लक्ष्मण सुतार यांची भेट झाली असता, त्यांनी मला लाचेच्या रकमेची मागणी केली होती. परंतु मी नंतर देईन अशी काही कारणे सांगुन वेळ निभावुन नेली होती.

दि. १५.०४.२०२१ रोजी श्री लक्ष्मण सुतार यांना देण्यासाठी मी माझेकडे असलेली रक्कम रू. ५,०००/– घेवुन लाप्रवि, मुंबई कार्यालयास आले. सदरवेळी उर्वरीत रक्कम रू. ३५,०००/– खेळण्यातील नोटा वापरण्याचे ठरले. असे एकुण रू. ४०,०००/– देण्याचे ठरले व पुढे करण्यात येणा–या सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला पोनि उमेश गौंड यांनी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मी माझे मोबाईल क्र. ७७१५८३०९९० वरून श्री. लक्ष्मण सुतार, यांचा मोबाईल क्र. ९९७००१५२६५ वर कॉल करून ते त्यांचे कार्यालयात हजर असल्याची खात्री केली व मी त्यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात येत असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर मपोशि शिला शिगवण यांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर मी हजर केलेल्या लाचेच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावणे, अॅन्थ्रासिन पावडरचे उपयोग, गुणधर्म, प्रात्यक्षीक दाखविणे, लाचेच्या नोटा माझ्या पर्सच्या आत प्लॅस्टिकच्या पिशवीत ठेवणे, लाच स्विकृती नंतर इशारा करणे याबाबत योग्यत्या सुचना देवुण पंचासमक्ष कारवाई करून त्याबाबतचा पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर मी पंचासह पोनि उमेश गौंड व पथकासह निघुन, त्यांचे गाडीने श्री लक्ष्मण सुतार यांचे आर/मध्य विभाग, बोरीवली पश्चिम कार्यालयाचे जवळ आलो असता, थोडे आधी उतरून पोनि उमेश गौंड यांनी दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने, त्यांनी चालु करून दिलेला व्हॉईस रेकॉर्डर मपोशि शिला शिगवण हिचे मदतीने माझे ड्रेसला लावुन, त्यानंतर मी चालत श्री लक्ष्मण सुतार यांचे आर/मध्य विभाग, बोरीवली येथील कार्यालयात गेले. सदर कार्यालयात गेल्यावर माझे मागोमाग वर नमुद पथक ही नमुद कार्यालयात आले. मी एकटीच श्री लक्ष्मण सुतार यांचे तळमजल्यावरील केबिनमध्ये गेले व त्यांना देण्यासाठी पैसे आणल्याचे सांगितले. त्यांचेशी थोडेफार बोलणे झाल्यावर मी माझ्या पर्समधील पांढऱ्या रंगाच्या प्लास्टिकचे पिशवीतुन रू. ४०,०००/– रक्कम असलेली खाकी रंगाचे पाकीट लक्ष्मण सुतार यांचेकडे दिले. त्यानंतर मी लगेचच सदर

उमेश [illegible]
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

15/4/2021

Scanned with CamScanner

रूमच्या बाहेर येवुन, ठरलेला पुर्वनियोजित इशारा, डाव्या हाताने माझ्या ओढणीने चेहऱ्यावरील घाम पुसुन लाच स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला, त्यावेळी माझ्या आजुबाजुला असलेले सापळा पथक व पंच तेथे हजर झाले व त्यांनी लोकसेवक लक्ष्मण सुतार यांचे केबीनमध्ये जावुन त्यांचे दोन्ही हात पकडले व पथकातील पोनि उमेश गौंड यांचे सुचने नुसार मपोशि शिला शिगवण यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन तो पोनि उमेश गौंड यांचे कडे दिला असता, त्यांनी तो त्यांचे ताब्यात घेऊन मला रूमचे बाहेरच थांबण्यास सांगितले.

थोडया वेळाने पोनि उमेश गौंड यांनी मला लक्ष्मण सुतार यांचे केबीनमध्ये बोलावले व मी दिलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुषंगाने विचारणा केली, सदर वेळी मी लोकसेवक लक्ष्मण सुतार यांना लाचेची रक्कम ठेवलेले खाकी रगांचे पाकीट दिले असता, ते त्यांनी स्विकारुन त्यांचे टेबलच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवले असल्याचे सांगितले. सदरची हकिकत मी पंचा समक्ष सांगीतल्यानंतर मला पुन्हा बाहेर थांबण्याच्या सुचना दिल्या, त्यानंतर थेडया वेळाने पुन्हा आत बोलावुन माझे हातांची, कपडयांची, व पर्सची अल्ट्राव्हॉयलेट दिव्याखाली तपासणी केली. त्यानंतर पंचांसमक्ष मपोशि शिला शिगवण यांनी माझी अंगझडती घेऊन माझ्या सामानाची दिव्याखाली तपासणी करून माझे सामान परत दिले व मला हात धुवुन केबीनचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर पोनि उमेश गौंड व सापळा पथकासह मी सदर कार्यालयाचे दुसऱ्या मजल्यावर असलेल्या हॉलमध्ये आलो. तेथे आल्यावर पोनि उमेश गौंड यांनी मला पंचासमक्ष विचारणा केल्यावरुन मी, लक्ष्मण सुतार यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केले पासुन लक्ष्मण सुतार यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी इशारा करेपर्यंत घडलेली हकिकत सांगावी असे सांगितले. त्यावर मी वरिलप्रमाणे हकिकत सांगितली. पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक व माझ्यात वेळोवेळी झालेले संभाषण ऐकुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणाचे ट्रान्सक्रिप्ट तयार करण्यात आले.

एकंदरीत जानेवारी २०२१ मध्ये मी माझे पथकासह मार्च २०२१ महीन्यात केलेल्या पथनाटयाचे झालेले बील रू. २,६९,१००/— मंजुरीकरीता पुढे पाठविण्यासाठी, लक्ष्मण सुतार यांनी, मी सन २०२० मध्ये केलेल्या पथनाटयाच्या कामाचे मला मिळालेल्या बिल रकमेच्या पंधरा टक्के म्हणजेच रू. ४०,०००/— इतकी रक्कम लाच स्वरूपात मागणी केली होती. मी दिलेल्या लेखी तक्रारीवरून पंचासमक्ष दिनांक ३०/०१/२०२१ व ०३/०२/२०२१ रोजी केलेल्या पडताळणीत लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, तसेच आज दिनांक १५/०४/२०२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई मध्ये लक्ष्मण सुतार यांनी माझेकडून ४०,०००/— रक्कम लाच म्हणुन स्वीकारली असता, सापळा पथकाने लक्ष्मण सुतार यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले आहे. तरी श्री लक्ष्मण सुतार, दुय्यम अभियंता, आर/मध्य विभाग, बोरीवली पश्चिम यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यासाठी माझी तक्रार देत आहे.

समक्ष,

(उमेश गौंड) 15/4/2021

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

15/4/2021

Scanned with CamScanner

…राने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........तात्काळ........

…easons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..............................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........................................................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........................................................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

फिर्यादी यांनी सन २०२० मध्ये मनपा आर/मध्य विभाग येथे विविध ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन केले होते सदर कामाचे रु. २,६३०००/- इतके देयक मंजूर होवून यांना मिळाले होते सदर देयकातील ७५ टक्के रक्कम लाच म्हणून आलोसे यांच्याकडून मागणी होत होती. तदनंतर जाने-२१ मध्ये फिर्यादी यांना पुन्हा नव्याने काम मिळाले व यांनी ते पूर्ण केले होते. सदर केलेल्या कामाचे बिल मंजूर करायचे असेल तर आधीच्या मंजूर बिलाचे ७५ टक्के रक्कम म्हणजे रु. ४००००/- इतक्या लाचेची मागणी आलोसे सुतार यांनी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने यांनी लाप्रवि, मुंबई येथे तक्रार दिल्याप्रमाणे पडताळणी करण्यात आली. दि. १५/०४/२०२१ रोजी सापळा कारवाईत आलोसे सुतार यांना रु. ४००००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता यांना रंगेहाथ पकडले.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

श्री. उमेश गौंड, पोलिस निरीक्षक

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..............................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........................, जिल्हा.................., राज्य..................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................. Rank............... No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................. (3) Transferred to P. S. ..................................................
District.................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

15/4/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही 15/04/2021

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name उमेश रमेश गौड

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, लाप्रवि, मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र. ..................................

Posting

Code No. of I. O. ..................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with CamScanner